## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र .८१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/१२/२०१७

**१) क्षुल्लक कारणा वरून काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंदः—**

दिनांक १५/१२/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा रोडचे बाजुला असलेल्या बोरीच्या झाडाची काठी तोडत असतांना यातील आरोपी याने माझे घरासमोरील काठी तोडु नको असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण केले व फिर्यादीला शिवीगाळ करून कुपंनाचे बासाचे काठीने डोक्यावर , हातावर मारपीट करून जखमी केले, तसेच फिर्यादीची पत्नी भांडण सोडविण्यास गेली असता त्याच काठीने डावे हाताचे मनघटा जवळ मारल्याने तिचे सुध्दा हाताला आपखुने दुखापत केल्याने फिर्यादी भारत यशंवत चांदेवार वय ४७ वर्ष रा. राजीव नगर पोहरा ता. लाखनी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) अन्यायाने विश्वासघात करून एटीएम मधुन पैसे काढल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १४/१२/२०१७ चे ११.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा एस.बी.आय साकोली येथील बॅक मॅनेजर सांगुन तुमचा एटीएम कार्ड खराब झाला त्याचा नुतनीकरण करून देतो असे सांगुन, विश्वासात घेवुन फिर्यादीचे एटीएम मधुन ऑनलाईन आधार कार्ड नंबर वरून ३२,४५०/रु काढुन अन्यायाने विश्वासघात केल्याने, फिर्यादी भारत पांडुरंग गजभीये वय ५३ वर्ष रा. राममंदीर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२० भादवी. सहकलम ६६(क) आयटी अॅक्ट. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. सिडाम पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) ट्रॅक्टच्या धडकेत सायकल स्वाराचा मृत्यु :—**

दिनांक १५/१२/२०१७ चे १६.१५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन, जांब गावाकडे जाणारा सायकल स्वार मानिक रामाजी अतकरी वय ६५ वर्ष रा. खैरलांजी यास धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने, व त्यास कोणतेही वैद्यकीय मदत पुरवता पळुन गेल्याने, फिर्यादी शैलेश सुभाष अतकरी वय २३ वर्ष रा. खैरलांजी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३०४,(अ) भादवी. सहकलम १८४/१३४(२) मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नी. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक १५/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, अडयाळ व लाखांदुर येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लटर हातभट्टी दारू किंमती ३,०००/—रु. व ३१ लिटर ७८० मिलीलीटर देशी दारू असा एकुन ४,१०२/रु. चा माल जप्त करण्यात आला.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १५/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी — ०१ तीन सिटर वाहनांवरती— ०९ केसेस व ईतर वाहनांवरती ५७ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.